# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमामार्फत 74 डिझेल बसचा ताफा उपलब्ध असून नव्याने खरेदी करण्यात येत असलेल्या 57 इलेक्ट्रिक बस पैकी 20 इलेक्ट्रिक बस ताफ्यात दाखल झाल्या आहेत. या 20 इलेक्ट्रिक बसपैंकी 10 बस यापूर्वीच विविध जुन्या/ नविन बसमार्गावर सुरू करण्यात आल्या आहेत. उर्वरीत 10 बसदेखील मा.आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर भा.प्र.से यांचे निर्देशानुसार आज दि.14/03/2024 पासून खालीलप्रमाणे नविन बसमार्गावर प्रायोगिक सुरू करण्यात आल्या आहेत.

1) बसमार्ग क्र.5 भाईंदर स्थानक (प.) स्थानक ते काशिमिरा नाका (60 फुट रोड, मॅक्सेस मॉल मार्गे.) (तुर्त रस्त्याचे कामामुळे पोलीस स्टेशन मार्गे)
2) बसमार्ग क्र.20 भाईंदर स्थानक (प.) ते मोर्वा भाट (मॅक्सेस मॉल मार्गे)
3) बसमार्ग क्र.25 मिरारोड स्थानक पूर्व ते काशिमिरा नाका (सृष्टी, शांतीगार्डन, मिरागाव, प्लेझंट पार्क मार्गे)
4) बसमार्ग क्र.28 मिरारोड स्थानक पूर्व ते भाईंदर स्थानक (पू.) (नयानगर, दिपक हॉस्पिटल स्व. हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मैदान, इंद्रलोक पोलीस चौकी मार्गे)
5) तसेच यापूर्वी सुरू केलेल्या बसमार्ग क्र.23 हा भाईंदर पूर्व स्थानक ते पेणकरपाडा असा असून हा बसमार्ग पेणकरपाडा वरून पूढे बोरीवली नॅशनल पार्कपर्यंत विस्तारीत करण्यात येत आहेत.

उक्त नव्याने सुरू करण्यात येत असलेले बसमार्गामुळे एकूण 24 बसमार्गावर महानगरपालिकेची परिवहन सेवा कार्यरत होणार असून शहरातील नागरिकांना भाईंदर स्थानक (प.), मिरा रोड स्थानक (पू.), भाईंदर स्थानक (पू.), काशिमिरा, दहिसर मेट्रो स्टेशन, बोरीवली नॅशनल पार्क इत्यादी ठिकाणी जाणे-येण्यासाठी फायदा होणार आहे. सध्या परिवहन सेवेच्या बसचा लाभ घेणाऱ्या प्रवाशांची एका दिवसातील संख्या 97,000 पर्यंत पोहचली असून दैनंदिन 1,25,000 प्रवासी वाहतुकीचा महानगरपालिका परिवहन उपक्रमाचा मानस आहे.

त्याचप्रमाणे मिरारोड/भाईंदर येथुन मुंबई विमानतळ मार्गे वांद्रे (बीकेसी) पर्यंत नविन इलेक्ट्रिक 12 मीटर वातानुकुलीत बस प्राप्त झल्यानंतर बसमार्ग सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

तरी, नागरीकांनी जास्तीत जास्त परिवहन सेवेचा लाभ घ्यावा, असे मा.आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर भा.प्र.से यांनी आवाहन केले आहे.

**(अनिकेत मानोरकर)**
**अति.आयुक्त तथा**
**परिवहन व्यवस्थापक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**